पनवेल :

आपले प्रश्न व भेडसावणाऱ्या समस्या सोडवून सर्वांगिण विकासासाठी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्याच उमेदवाराला विजयी करा, असे आवाहन मावळ लोकसभेचे आघाडीचे उमेदवार ॲड. राहुल नार्वेकर यांनी येथे केले. नार्वेकर यांच्या प्रचारासाठी नेरे येथे मंगळवारी (दि. ८) भव्य जाहीर सभा झाली. त्या वेळी ते बोलत होते.

आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष आर. सी. घरत, उपाध्यक्ष जी. आर. पाटील, तालुका काँग्रेसचे कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत, जेष्ठनेते श्याम म्हात्रे, कामगार नेते महेंद्र घरत, इंटकचे तालुकाध्यक्ष संजय पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भीमसेन माळी, आर.पी.आय. (डेमो.)चे जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे, नरेंद्र गायकवाड, शिवाजी दुर्गे, संतोषी मोरे, अप्पा तेरडे आदी मान्यवर उपस्थित होते.

आपल्या भाषणात ॲड. नार्वेकर पुढे म्हणाले की, ही निवडणूक देशातील लोकशाहीच्या सर्वोच्च सभागृहाची आहे. तेथे तुमच्या समस्यांची जाण असलेला, देशाच्या हिताची जाणीव असलेला लोकप्रतिनिधी पाठविणे आवश्यक आहे. देशाच्या धोरणात तुमचे प्रतिबिंब उमटविण्याची धमक असलेला अभ्यासु व उच्चशिक्षित प्रतिनिधी पाठविणे आवश्यक आहे. त्यासाठी विचार करून आपले मत देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

पनवेल विधानसभा मतदारसंघाला लोकांच्या प्रश्नांची जाण असलेले योग्य प्रतिनिधी आमदार प्रशांत ठाकूर मिळाल्यामुळे विद्यमान खासदारांनी जेवढी विकास कामे या मतदार संघात केली नाही त्यापेक्षा कितीतरी अधिक कामे प्रशांत ठाकूर यांनी केली. दिल्लीशी निगडीत असलेली कामे आणि भावी पिढ्यांच्या उत्कर्षासाठी योग्य लोकप्रतिनिधी निवडून देणे आवश्यक आहे, असेही नार्वेकर म्हणाले.

शेकापचा समाचार घेताना ॲड. नार्वेकर म्हणाले की, ज्या पक्षाला कालपर्यंत उमेदवार मिळत नव्हता.कसा तरी आयात करून उमेदवार मिळाला तो सुध्दा घाटावर सांगतो मी अपक्ष आणि घाटाखाली आला की सांगतो मी शेकापचा. त्यामुळे ज्या पक्षाची उमेदवारी घेतली त्या पक्षाचे नाव सांगायला ज्याला लाज वाटते असा दुहेरी भुमिका मांडणारा उमेदवार तुमच्या आमच्या बाबत काय भुमिका मांडेल असा सवालही त्यांनी केला. सामान्य माणसाच्या हिताची कामे काँग्रेस आघाडी सरकारच करू शकते त्यामुळे भविष्यात आपल्याला विकास साधायचा असेल तर काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या उमेदवाराला विजयी केले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी मतदारांना केले.

शेकापच्या ५२ वर्षाच्या राजवटीत जो विकास झाला नाही तो साडेचार वर्षात केला- आ. प्रशांत ठाकूर

शेतकरी कामगार पक्षाच्या ५२ वर्षाच्या काळात पनवेल तालुक्यात जेवढी विकासकामे झाली नाहीत तेवढी विकासकामे काँग्रेस पक्षाचा आमदार येथे निवडून आल्यानंतर केली आहेत, असे प्रतिपादन आ. प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात केले. ते पुढे म्हणाले, हे केवळ राज्यातील काँग्रेस पक्षाच्या सरकारमुळेच होवू शकले. या मतदारसंघाचे केंद्राशी संबधित अनेक प्रश्न आहेत ते सोडविण्याच्या दृष्टीने तेथेही आपल्याला आपला माणूस निवडून देणे गरजेचे आहे. सरकारचे पाठबळ असेल तर आपल्या शहर तालुक्याला भेडसावणारे प्रश्न समस्या सहजपणे सोडवून विकासाची नवनवी शिखरे गाठता येतात. पनवेल तालुक्यावर काँग्रेसचा तिरंगा फडकल्यानंतर सरकारच्या माध्यमातून आपण येथे विकासाच्या नवनवीन संकल्पना राबवू शकलो.केंद्रातही आपल्याला याच पध्दतीने आपले प्रश्न मांडून ते सोडविता येणे शक्य आहे. त्यासाठी तसा लोकप्रतिनिधी तेथे पाठविणे आवश्यक आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीने तुमच्या मनातील ही खंत दूर करण्यासाठी तसा उमेदवार तुम्हाला दिला आहे. आपल्या विकासासाठी आपले प्रश्न सोडविण्यासाठी सुविद्य व समस्यांची जाण असलेल्या राहुल नार्वेकर यांना विजयी करा, असे आ-वाहनही त्यांनी सरतेशेवटी केले.

कामगार नेते श्याम म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष जी. आर. पाटील, कामगार नेते महेंद्र घरत, राष्ट्रवादीचे तालुका अध्क्ष भिमसेन माळी यांचीही या वेळी भाषणे झाली.

या सभेसाठी वांगणीतर्फे वाजे विभागी अध्यक्ष सुनिल पाटील, विहीघर, धर्मा भोपी रिटघर, पनवेल तालुका चिटणीस सुनिल पाटील, राष्ट्रवादचे जेष्ठ नेते नामदेव पाटील, वाजे, राजा भोईर वाजे, नारायण माळी, उमरोली, उपसरपंच बगाराम रोडपालकर, राजाराम पाटील, नेरे येथील जेष्ठ कार्यकर्ते दत्तूशेठ, नेरा सरपंच वासुदेव गवते, जयराम वाघे, राष्ट्रवादीचे युवा नेते दर्शन ठाकूर, ग्रा.प. सदस्या गिताबाई पाटील, निता चोणकर, सुलोचना पाटील, सुनिल पाटील, जगन पाटील, भगवान पाटील, गोटीराम म्हात्रे, बबन मेस्त्री, कृष्णा मगर, रामदास मगर,पद्माकर मानकामे, गोपाळ मानकामे, दत्ता पाटील व इतर अनेक कार्यकर्ते मान्यवर या सभेला उपस्थित होते.